| MHRT030000812026 | **फौ.कि.अर्ज क्र.१५/२०२६**<br>**तानाजी गणपती चव्हाण**<br>**वि.**<br>**पोलिस निरीक्षक, रत्नागिरी ग्रामीण**<br>**पोलिस ठाणे व इतर** |
|---|---|

**<u>नि.क्र.०१ वरील आदेश</u>**
**(दि.०१.०४.२०२६)**

अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ५०३ अन्वये जप्त प्राणी हे सुपुर्तनाम्यासह परत मिळणेकरीता दाखल केला आहे.

**२.** अर्जदार यांच्या कथनाप्रमाणे, गु.र.क्र.२२३/२०२५ प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० चे कलम ११(१)(अ),(ड),(इ),(फ),(ह) व महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ११९ प्रमाणे दाखल गुन्हयामध्ये तपासादरम्यान पोलीसांनी अर्जदाराचे अर्जात नमुद प्राणी जप्त केले आहेत. सदर प्राणी हे अर्जदारास त्यांच्या दैंनदिन शेतीवापरासाठी आवश्यक असल्याने अर्जदार यांनी सदरील प्राणी हे सुपूर्तनाम्यावर त्यांना देण्याची विनंती केली आहे.

**३.** तपास अधिकारी यांनी नि.क्र.०९ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन तपासादरम्यान जप्त प्राणी अनिल राजाराम शिंदे, संजय वामन सावंत व महेश श्रीधर सावंत यांच्या मालकीचे असल्याचे निष्पन्न झाले आहे असे सांगून अर्जदाराने जप्त प्राण्यांची खरेदी पावती सादर केल्यास त्यांना जप्त प्राणी देण्यास हरकत नाही असे सांगितले आहे. त्याचप्रमाणे सरकारी अभियोक्ता यांनी नि.क्र.०१ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन जप्त प्राणी अर्जदाराचे असल्याबाबत अर्जदाराने कोणताही पुरावा सादर केलेला नाही. त्यामूळे मूळ गुन्हयाचा अंतिम निकाल लागेपर्यंत जप्त प्राणी गोशाळेतच ठेवण्याची विनंती केली.

**४.** गोशाळेस त्यांचे म्हणणे दाखल करण्यासाठी नोटीस काढण्यात आली परंतु नोटीसचा कोणताही अहवाल संबंधित पोलिस ठाण्यातून सादर करण्यात आला नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज गोशाळेचे म्हणणे न घेता पुढे चालवण्यात आले.

**५.** उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**६.** सदर प्रकरणात अर्जदार यांनी, जप्त केलेल्या जनावरांवर त्यांची मालकी आहे, हे दाखवण्यासाठी यादी नि.क्र.०३ वरील यादी सोबत अर्जदारांच्या नावे असलेले शेतीचे ७/१२ उतारे दाखल केलेले आहेत. यावरुन अर्जदार शेतकरी असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते. त्याचप्रमाणे तपास अधिकारी यांनी त्यांचे नि.क्र.९ वरील म्हणणेमध्ये जप्त प्राणी हे अनिल राजाराम शिंदे, संजय वामन सावंत व महेश श्रीधर सावंत यांच्या मालकीचे असल्याबाबत त्यांच्या तपासात निष्पन्न झाले असे सांगितले आहे. परंतु सदर तिन्ही लोकांनी नि.क्र.११ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन जप्त प्राणी अर्जदारास देण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही असे सांगितले आहे. त्याचप्रमाणे अर्जदारातर्फे नि.क्र.१४ वर प्रतिज्ञापत्र दाखल करुन जप्त प्राण्यांचा जन्म झाल्यापासून ते त्यांच्याच ताब्यात आहेत. त्यामुळे त्यांच्याकडे त्यांच्या मालकीबाबत कोणतीही कागदपत्रे किंवा बिले उपलब्ध नाहीत. तसचे कृषीप्रधान असल्याने शेतकरी यांच्याकडून शेतीच्या पुरक असणा-या प्राण्यांच्या मालकीबाबत कोणतीही कागदपत्रे ठेवण्यात येत नाही असे सांगितले आहे. आज रोजी पर्यंत जप्त प्राणी अर्जदाराचे नाही याबाबत कोणीही आक्षेप नोंदविला नाही. त्यामुळे अभिलेखावरील पुराव्यावरुन जप्त प्राणी हे प्रथमदर्शनी अर्जदार यांच्या मालकीचे आहेत असे दिसून येते.

**७.** भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ५०३ चे अवलोकन केले असता त्यामध्ये जप्त मुद्देमालाच्या संदर्भात फौजदारी न्यायालयासमोर हक्कदार असलेली व्यक्ती जप्त मुद्देमालाच्या संदर्भात सुपुर्तनाम्यावर योग्य त्या अटी शर्तीवर मागू शकते. तसेच प्रस्तुत कलमामध्ये चौकशी किंवा संपरिक्षेत जप्त मुद्देमाल फौजदारी न्यायालयासमोर आणली गेली नसेल, तेव्हा त्या मुद्देमालाची विल्हेवाट करणे किंवा तिच्या कब्जास हक्कदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे त्याची सुपुर्तगी करणे याबाबत आदेश देउ शकत असल्याचे नमुद आहे. तसेच गुन्हायातील जप्त प्राणी हे ब–याच कालावधीपासून जप्त असल्याने व सदर अपराधाचे दोषारोपपत्र दाखल होउन प्रकरण निकाली लागण्यास बराच कालावधी लागणार असल्याने जप्त प्राणी विनाकारण संबंधीत गौशाळेमध्ये ठेवणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे सदर जप्त जनावरे हे अर्जदारांना योग्य त्या अटी व शर्ती

घालून सुपुर्तनाम्यावर परत करणे योग्य राहिल. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे :–

## आदेश

| | |
|---|---|
| (१) | अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |
| (२) | अर्जदार यांना जप्त प्राणी हे रक्कम रु.५०,०००/- (रुपये पन्नास हजार फक्त) सुपुर्तनाम्यावर परत देण्यात यावे. |
| (३) | अर्जदाराने जप्त प्राणी मिळाल्यानंतर त्यांची योग्यरित्या काळजी घेण्याचे आहे व त्यांना विक्री किंवा हस्तांतर करण्याचे नाही. |
| (४) | अर्जदाराने जप्त प्राणी मिळाल्यानंतर प्रस्तुत खटल्याच्या चौकशी कामी जेव्हा-जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा-तेव्हा जप्त प्राणी न्यायालयासमक्ष स्वखर्चाने हजर करणेचे आहेत. |
| (५) | अर्जदाराने जप्त प्राणी गौशाळेत दाखल केल्यापासून ते परत मिळेपर्यंत प्रतिदिवस १००/- रुपये प्रमाणे त्याबाबतचा खर्च गौशाळेत नियमाप्रमाणे जमा करावा. |
| (६) | अर्जदाराने नियमाप्रमाणे जप्त प्राण्याबाबतचा खर्च गौशाळेस जमा केला नाही तर सदरची रक्कम प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा नियम ५ (८) प्रमाणे जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी सदर रक्कम थकीत रक्कम म्हणून वसुल करुन गौशाळेस देण्याचे आहे. |
| (७) | संबंधित तपास अधिकारी यांनी जप्त प्राणी अर्जदाराला परत देण्यापूर्वी त्याबाबतचे छायाचित्र व स्वतंत्र पंचनामा करुन दोषारोपपत्रात समाविष्ट करावे. |

SHABNAM YUNUS SHAIKH

Digitally signed by SHABNAM YUNUS SHAIKH
Date: 2026.04.01 17:40:33 +0530

**( शबनम युनूस शेख )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्या. क्र.२,**
**रत्नागिरी.**

**दिनांक : ०१.०४.२०२६**